वाचले :-

१. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम २०११ मधील सुधारीत तरतूदी.

२. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.बीसीसी-२०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दि. ७ मे २०२१.

३. पदोन्नती समिती सभा दिनांक १२/०७/२०२१ चा सभावृत्तांत.

४. मा.आयुक्तसो यांचा दिनांक- १८/०७/२०२१ चा मान्य प्रस्ताव.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८. प्रशासन विभाग
क्रमांक प्रशा/०४/कावि/१००९/२०२१
दिनांक १८/०७/२०२१

विषय :- ' उपलेखापाल ' पदावरील पदोन्नतीबाबत.

आदेश,

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर ' उपलेखापाल ' अभिनामाची रिक्त असणारी पदे पदोन्नतीने भरण्याकरीता दि.१२/०७/२०२१ रोजी पदोन्नती समिती सभा आयोजित करण्यात आलेली होती. सदरच्या समितीने शासन निर्णय क्र.बीसीसी-२०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दि. ७ मे २०२१ अन्वयेचे निर्देश विचारात घेता, पदोन्नतीपूर्व लिपिक पदावरील कर्मचा-यांची शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी, गोपनीय अहवाल, सेवाजेष्ठता, मत्ता व दायित्व आणि शिस्तभंग विषयक कारवाई इ. सेवाविषयक तपशील पडताळून रिक्त असणा-या पदावर खालील नमूद लिपिक पदावरील कर्मचाऱ्यांना पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२० नुसार उपलेखापाल अभिनामाच्या पदावर पे बॅन्ड एस-१४ वेतनश्रेणी र.रु.३८६०० - १२२८०० मध्ये मा.सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असलेली विशेष अनुज्ञा याचिका क्र. २८३०६/२०१७ च्या अंतिम निर्णयाच्या अधिन राहून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात ज्येष्ठतेनुसार पदोन्नती देण्यास शिफारस केली आहे.

| अ.क्र | लिपिक कर्मचा-यांचे नाव | प्रवर्ग |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १. | भांगे बाळु मारुती | ज्येष्ठतेनुसार |
| २. | बनसोडे दैवशैला दादाराव | ज्येष्ठतेनुसार |
| ३. | रणपिसे मिलींद नंदू | ज्येष्ठतेनुसार |
| ४. | चव्हाण शुभांगी शशिकांत | ज्येष्ठतेनुसार |
| ५. | झुंझुरके विनोद गणपत | ज्येष्ठतेनुसार |
| ६. | रणसिंग प्रियांका सोपान | ज्येष्ठतेनुसार |
| ७. | निगडे अश्विनी महेश | ज्येष्ठतेनुसार |
| ८. | सोलंकी राजेश मुर्जीलाल | ज्येष्ठतेनुसार |
| ९. | कुलकर्णी पल्लवी सुनिल | ज्येष्ठतेनुसार |
| १०. | पवार संदीप मधुकर | ज्येष्ठतेनुसार |
| ११. | कोमकर गणेश भगवान | ज्येष्ठतेनुसार |
| १२. | देशपांडे अक्षय भगिरथ | ज्येष्ठतेनुसार |
| १३. | घोडके वनिता नितीन | ज्येष्ठतेनुसार |
| १४. | कुदळे संतोष शंकर | ज्येष्ठतेनुसार |
| १५. | हांडे दिप्ती ज्ञानेश | ज्येष्ठतेनुसार |
| १६. | भगत रमेश बाळासाहेब | ज्येष्ठतेनुसार |
| १७. | पिंगळे अरविंद गणपत | ज्येष्ठतेनुसार |

| अ.क्र | लिपिक कर्मचा-यांचे नाव | प्रवर्ग |
|---|---|---|
| १८. | जाधव दत्तू रमेश | ज्येष्ठतेनुसार |
| १९. | शिंदे योगेश ज्ञानेश्वर | ज्येष्ठतेनुसार |
| २०. | धंगेकर गिता राजेश | ज्येष्ठतेनुसार |
| २१. | वहुरे रामचंद देवचंद | ज्येष्ठतेनुसार |
| २२. | वंजारी मोहन रामचंद्र | ज्येष्ठतेनुसार |
| २३. | पांचाळ स्वप्नील अशोक | ज्येष्ठतेनुसार |
| २४. | जाधव सुवर्णा तुकाराम | ज्येष्ठतेनुसार |
| २५. | पवार रुपाली अमीत | ज्येष्ठतेनुसार |
| २६. | निगडे महेश नंदकुमार | ज्येष्ठतेनुसार |

सबब, उपरोक्त नमूद बाबी विचारात घेता, मी अतिरिक्त आयुक्त (१) , पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पदोन्नतीमधील आरक्षण रद्द करण्यासंदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये न्यायप्रविष्ठ असलेली विशेष अनुज्ञा याचिका क्र. २८३०६/२०१७ मध्ये होणारा अंतिम निर्णय व शासन निर्णय दि.०७/०५/२०२१ चे अधिन तसेच सदर पदोन्नती मा.उच्च न्यायालय, मुंबई येथील प्रलंबित असलेल्या रिट पिटीशन (स्टॅम्प) क्र. १०८७६/२०२१, रिट पिटीशन (स्टॅम्प) क्र. १०८७८/२०२१ तसेच रिट पिटीशन (स्टॅम्प) क्र. १०९०९ / २०२१ मध्ये होणा-या अंतीम निर्णयाच्या अधीन राहून उपरोक्त नमूद कर्मचा-यांना ज्येष्ठतेनुसार उपलेखापाल या अभिनामाचे पदावर पे लेवल एस-१४ वेतनश्रेणी र.रु.३८६०० - १२२८०० या वेतनश्रेणीमध्ये निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात ज्येष्ठतेनुसार दिनांक १९/०७/२०२१ पासून सद्यस्थितीत कार्यरत असलेल्या विभागामध्येच पदोन्नतीने पदस्थापना देण्यास प्रस्तूतच्या आदेशान्वये मान्यता देत आहे. तसेच सद्यस्थितीत महानगरपालिका आस्थापनेवर लिपिक कर्मचारी कमी असलेने उक्त आदेशातील नमूद कर्मचा-यांनी आवश्यकतेमुळे लिपिक पदाचे व उपलेखापाल या पदांचे कामकाज करणे बंधनकारक राहील. पदोन्नती झालेल्या कर्मचा-यांना सविस्तर पदस्थापना देणेचे आदेश अलहिदा स्वतंत्रपणे देणेत येतील.

मागासवर्ग कक्षाकडील दि.०८/०७/२०२१ चे अभिप्रायानुसार प्राप्त झालेला दिव्यांग आरक्षण अहवाल विचारात घेता उपलेखापाल संवर्गामध्ये दिव्यांग पदांसाठी एकुण १ पद आरक्षित होत आहे. परंतू उपलेखापाल पदावर दिव्यांग आरक्षणात एकुण ०६ कर्मचारी कार्यरत असलेने दिव्यांगाचे पदावर सद्यस्थितीत कार्यरत असणा-या दिव्यांग कर्मचा-यांचे समायोजन करणेस मान्यता देणेत येत आहे.

मनपाचे सेवा प्रवेश नियमातील तरतूदीनुसार लेखा संवर्गातील कर्मचा-यांना पदोन्नती देणेपुर्वी विभागीय परीक्षा घेणेचे धोरण / नियोजन अद्याप अंतीम करणेत आलेले नाही. तथापि, मनपाचे कामकाजाचे दृष्टीने उपलेखापाल पदावरील कर्मचा-यांची आवश्यकता आहे. त्यामुळे विभागीय परिक्षेबाबत अंतीम धोरण निश्चित होईपर्यंत यापुर्वीचे अर्हतेनुसार एल.एस.जी.डी परिक्षाच अर्हताकारी विभागीय परीक्षा गृहीत धरुन लेखा संवर्गातील पदोन्नतीस पात्र कर्मचा-यांना उपलेखापाल पदावर पदोन्नती देण्यास मान्यता देणेत येत आहे.

उपरोक्त कर्मचारी सध्या ज्या विभागात काम करीत आहेत, त्या विभागप्रमुखांनी प्रस्तूत पदोन्नतीचे आदेश वरील कर्मचा-यांना तात्काळ बजवावेत व त्याबाबत त्यांचे दिनांकीत स्वाक्षरीची पोहोच प्रशासन विभागाकडे पाठवावी.

प्रस्तुत आदेशाची नोंद संबंधित कर्मचा-यांचे सेवानोंद पुस्तकात घेण्यात यावी.

सही/-
(विकास ढाकणे)
अतिरिक्त आयुक्त (१)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी४११०१८

प्रति,

श्री/श्रीमती ---------------------------

प्रत-

१. लेखा विभाग २. लेखापरिक्षण विभाग ३. प्रशासन टेबल क्रमांक ७, ९, १०, १२, १४, संगणक कक्ष

४. पिं.चिं.म.न.पा. कर्मचारी महासंघ ५. पिं.चिं.म.न.पा.कर्मचारी सेवकांची सह.पतसंस्था

६. सर्व संबंधित विभाग----------------------

सहाय्यक आयुक्त, प्रशासन
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११०१८